# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## (क्रिडा व शारिरिक शिक्षण विभाग)

एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५
फोन नंबर ०७१३२-२२३१०९, मो.नं.९८५०३८८५७०


जा.क्रं.गों.वि./००१/२०१६-१७ दिनांकः- १३/०६/२०१६

प्रती,
मा. प्राचार्य,
संलग्नीत सर्व महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय :- शारिरिक शिक्षण विभाग "प्राध्यापकाची" एक दिवसीय कार्यशाळा दि. २३/०६/२०१६ आयोजनाबाबत.**

महोदय,

सत्र २०१६-२०१७ च्या प्रथम दिवशी आपले महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी व संस्थेचे सर्व पदाधिकारी यांना नविन सत्राच्या शुभेच्छा व सत्र २०१५-२०१६ मध्ये आपले महाविद्यालयाने प्राप्त केलेल्या यशाबद्ल आपले व खेळाडुचे तसेच शारिरिक शिक्षण प्राध्यापकांचे मा.कुलगुरु डॉ.एन.व्ही.कल्याणकर यांचे तर्फे व शारिरिक शिक्षण विभागातर्फे अभिनंदन.

मा. कुलगुरु डॉ. एन.व्ही.कल्याणकर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २३/०६/२०१६ रोजी शारिरिक शिक्षण प्राध्यापकांची एक दिवसीय कार्यशाळा ठिक ११.०० वाजता विद्यापीठाचे सभागृहात आयोजित केलेली आहे. तरी आपले महाविद्यालयात कार्यरत शारिरिक शिक्षण प्राध्यापकांना कार्यशाळेला उपस्थित राहण्याचे आदेश देण्याचे करावे, जेणेकरुन २०१६-२०१७ सत्रात राबविण्यात येणाऱ्या सर्व क्रिडा स्पर्धाचे आयोजन करण्यास प्राध्यापकांची मदत विद्यापीठास घेता येईल.

ज्या महाविद्यालयात प्राध्यापकांची नियुक्ती केलेली नसेल त्या महाविद्यालयाने क्रिडा विभागासी सबंधित प्राध्यापकाला पाठविणे गरजेचे आहे.

कार्यशाळेतील विषयावर प्राध्यापकांना आपले मुक्त विचार मांडता येतील, करिता आपल्या विचारावर उपाय सुध्दा त्यांनीच सुचवायचे आहेत, तरी लिखीत स्वरुपात सादर करावेत. वरील कार्यशाळेस जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहुन कार्यशाळा यशस्वी करण्यास मदत करावी.

**कार्यशाळेचे विषय :-**

१) विविध स्पर्धामध्ये भाग घेण्याकरिता पात्रता निकष.
२) पात्रता निकष प्रपत्र व्यवस्थित भरणे.
३) आंतर महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्याबाबत.
४) आंतर विद्यापीठ स्पर्धेकरिता संघ व्यवस्थापक म्हणुन जबाबदारी स्विकारणे.
५) प्रशिक्षण शिबीराबाबत व संघ निवडीचे निकषाबाबत.
६) नविन खेळ (रस्साखेच, सेफकटार्का) आंतर महाविद्यालय क्रिडा स्पर्ध्यामध्ये समावेशबाबत.
७) प्रवेश शुल्क ठरविणे.
८) प्राध्यापकाच्या वतीने उपस्थित होणारे विषय.

GONDWANA UNIVERSITY PHYSICAL EDUCATION DEPARTMENT GADCHIROLI (M.S.)

**(प्रा.एस.व्ही.कोहळे)**
**संचालक**
क्रिडा व शारिरिक शिक्षण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली